
सकाळ

“



पंचगंगा नदी जीवनदायिनी आहे. तिला प्रदूषणमुक्त करण्याची जबाबदारी सर्वांची आहे. त्यासाठी 'सकाळ'ने हाती घेतलेला उपक्रम विधायक आहे. पंचगंगा प्रदूषणमुक्तीसाठी शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभाग उपक्रमात सहभागी होतील. प्रत्येक नागरिकाने सहभागी होऊन नदी प्रदूषण रोखण्यासाठी पुढाकार घ्यावा.

– डॉ. डी. टी. शिर्के,
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

तरुण भारत

# केआयटीच्या पायोनिअरचे रविवारी उद्‌घाटन

**कोल्हापूर :** केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयात इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन (आयएसटीई) स्टुडन्ट चॅप्टर अंतर्गत 'पायोनिअर २०२२' या राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक स्पर्धेचे उद्‌घाटन २४ एप्रिल रोजी होणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, मर्सिडीज बेन्झचे जनरल मॅनेजर डॉ. उमेश देशपांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. २५ एप्रिल रोजी स्पर्धेचा समारोप बी. एम. मनोज यांच्या हस्ते होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
21 APR 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्येष्ठांच्या विकासासाठी विद्यापीठ कटिबद्ध

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

ज्येष्ठ नागरिकांचे विचार भावी पिढीसाठी महत्त्वपूर्ण असून हा अनुभवांचा साठा नवीन पिढीकडे संक्रमित होणे आवश्यक आहे. या अनुभवसंपन्न विचारधारेतून सक्षम समाज घडविण्यासाठी मदत होईल. ज्येष्ठ नागरिकांच्या विकासासाठी विद्यापीठ भरीव योगदान देण्यासाठी कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, कोल्हापूर डिजिटल फेस्कॉम ॲकॅडमी व प्रादेशिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी संगणक साक्षरता कार्यशाळा आयोजित केली होती. याप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. पाटील म्हणाले, संगणक युगात ज्येष्ठसुद्धा संगणक साक्षर होणे गरजेचे आहे. सर्वच स्तरावर संगणकाचा वापर होत आहे, त्यामुळे ज्येष्ठ व्यक्तींना अडचणी येतात, या अडचणी दूर करण्यासाठी अशा कार्यशाळा उपयुक्त आहेत. समाजात ज्येष्ठांना सन्मानाचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी त्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी विद्यापीठ नेहमी कार्यरत आहे.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत अविनाश लकारे, अरूण रोडे, डॉ. ए. एम. गुरव.**

फेस्कॉमचे अध्यक्ष अरुण रोडे म्हणाले, काळाची गरज लक्षात घेऊन सर्व ज्येष्ठ नागरिकांनी वागले पाहिजे. कालानुरूप झालेले बदल लक्षात घेऊन या वयातदेखील नवीन ज्ञान मिळविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. अविनाश लकारे यांनी सायबर क्राईमपासून सुरक्षा करण्यासाठी संगणक ज्ञान आवश्यक असून ते आत्मसात करण्यासाठी ज्येष्ठांनी प्रयत्न करावे, असे आवाहन केले.

कार्यशाळेत अविनाश लकारे, स्वाती फडके, वनिता केळकर, डॉ. ए. एम. गुरव, विवेक देशपांडे, नाना इंगळे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्तविक श्रीकांत अडिवरेकर यांनी केले सूत्रसंचालन कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण यांनी केले. यावेळी अरुण रोडे, अविनाश लेकरे, डॉ. ए. एम. गुरव यांच्यासह ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठाच्या ४६७ परीक्षांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमाच्या ४६७ परीक्षांचे निकाल परीक्षा व मूल्यमापन मंडळाने आतापर्यंत जाहीर केले. या मंडळाने बुधवारी एमबीए (दूरशिक्षण अभ्यासक्रम सत्र तीन आणि चार), एम. एस्सी. मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट सत्र एक, एमबीए सीबीसीएस सत्र तीन आणि चार या परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत, अशी माहिती प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

21 APR 2022
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वायू प्रदूषणाचे अपडेट आता डिजिटल स्क्रीनवर

## सिंचन भवन, शिवाजी विद्यापीठ परिसरात व्यवस्था; २४ तास मिळणार अपडेट्स

**कोल्हापूर : आशिष शिंदे**

वाढत्या वायू प्रदूषणामुळे स्वच्छ हवेसाठी ओळखले जाणारे कोल्हापूर शहर अक्षरश: प्रदूषणाच्या विळख्यात अडकले आहे. शहरातील वाढते वायू प्रदूषण नियंत्रणासाठी आणि प्रदूषणाच्या स्थितीची अचूक माहिती उपलब्ध होण्याकरिता शिवाजी विद्यापीठ व सिंचन भवन परिसरात स्वयंचलित वायू गुणवत्ता केंद्रे उभारण्यात आली आहेत. या केंद्रांचे काम अंतिम टप्प्यात असून, येत्या दोन आठवड्यांमध्ये ही केंद्रे कार्यान्वित होणार आहेत. यामुळे कोल्हापूरकरांना आता डिजिटल स्क्रीनवर २४ तास वायू प्रदूषणाची स्थिती दिसणार आहे.

शहरातील वाढत्या वायू प्रदूषणाचा धोका लक्षात घेता, मेट्रो सिटीप्रमाणे कोल्हापूर शहराकरिता ही 'स्वयंचलित वायू गुणवत्ता केंद्रे' (अँबियंट एअर क्वॉलिटी मॉनिटरिंग स्टेशन) मंजूर करण्यात आली आहेत. कधी जागेअभावी, तर कधी तांत्रिक अडचणींमुळे गेली तीन वर्षे या केंद्रांचे काम रखडले होते. तब्बल तीन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर दोन केंद्रांचे स्ट्रक्चर उभे राहिले असून, ॲनालाईझर बसविण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. येत्या दोन आठवड्यांमध्ये हे काम पूर्ण होणार आहे.

राष्ट्रीय वायू गुणवत्ता कार्यक्रमांतर्गत देशभरातील शहरांमध्ये हवेची गुणवत्ता मोजली जाते. मात्र, अत्याधुनिक स्वयंचलित केंद्रे देशातील मेट्रो सिटीज व ठराविक शहरांमध्येच आहेत. सध्या शहरामध्ये मॅन्युअल एअर क्वॉलिटी स्टेशन्सद्वारे हवेची गुणवत्ता मोजली जाते. मात्र, अनेकदा ही केंद्रेच बंद असल्याने तसेच मॅन्युअल असल्याने वायू प्रदूषणाची माहिती उपलब्ध होत नव्हती. नव्या स्वयंचलित केंद्रांमुळे प्रदूषणाची अचूक स्थिती समजण्यास मदत होणार आहे.

> “ दोन स्वयंचलित वायू गुणवत्ता केंद्रांचे काम अंतिम टप्प्यात आहे. येत्या दोन आठवड्यांमध्ये ही केंद्रे कार्यान्वित होतील. यामुळे शहरातील वायू प्रदूषणाची अचूक माहिती मिळेल व प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी मदत होईल.
>
> – **प्रमोद माने**, उपप्रादेशिक अधिकारी, एमपीसीबी

### हवेतील सल्फर, कार्बन, नायट्रोजन दिसणार स्क्रीनवर

सिंचन भवन परिसर व शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये उभारण्यात येणाऱ्या डिजिटल स्क्रीनवर हवेतील प्रदूषणाची अचूक स्थिती दिसणार आहे. या स्क्रीनवर हवेतील सल्फरडाय ऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड, पीएम २.५, पीएम १० चे रिअल टाईम प्रमाण दिसणार आहे.

### मनपाकडून एका केंद्रासाठी जागा देण्यास टाळाटाळ

शहरासाठी मंजूर ६ स्वयंचलित केंद्रांपैकी पहिल्या टप्प्यात तीन केंद्रे सुरू होणार होती. मात्र, फुलेवाडी येथील जागेसाठी महापालिकेने एनओसी देण्यास टाळाटाळ केल्याने केवळ दोनच केंद्रे सुरू होणार आहेत.

सकाळ

# संगीत व नाट्यशास्त्र विभाग

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सादर करीत आहोत

## ६० व्या महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धा

## प्राथमिक फेरीतील पारितोषिक प्राप्त नाटक

# अंधायुग

मूळ लेखक
**डॉ. धर्मवीर भारती**

मराठी अनुवाद
**शशिकांत कुलकर्णी**

दिग्दर्शक
**ज्ञानेश मुळे**

**वेळ : आज गुरुवार दि. २१ एप्रिल २०२२ रोजी संध्याकाळी ६:३० वाजता**

**स्थळ : केशवराव भोसले नाट्यगृह, कोल्हापूर**

प्रवेश विनामूल्य. अग्रक्रमानुसार.

काही आसने विशेष निमंत्रितांसाठी राखीव

पुढचा प्रयोग : दि. 9 मे 2022 रोजी विष्णुदास भावे नाट्यमंदिर, सांगली.

21 APR 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गो. मा. पवार यांचे लेख समीक्षकांसाठी मार्गदर्शक

## प्रा. अविनाश सप्रे यांचे प्रतिपादन : विद्यापीठात डॉ. गो.ना. पवार स्मृतिदिन

प्रतिनिधी
कोल्हापूर

गो.मा. पवार यांनी मराठीत नवा समीक्षाविचार निर्भीडपणे मांडला. त्यांनी लिहिलेले लेख आजच्या समीक्षकांसाठीही मार्गदर्शक स्वरुपाचे आहेत, असे प्रतिपादन प्रा. अविनाश सप्रे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे पहिले विभागप्रमुख डॉ. गो. मा. पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त शनिवारी 'गो. मा. पवार : व्यक्ती आणि विचार" या विषयावर साहित्यचर्चा आयोजित



करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या नीलांबरी सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

प्रा. सप्रे म्हणाले, गो. मा. पवार यांचे लेखन विवेकाचा विचार देणारे होते. त्यांनी मराठी साहित्य समीक्षकांमध्ये आपल्या लिखानातून वेगळी ओळख निर्माण केली होती. प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी गो. मा. पवार यांचे व्यक्तिमत्त्वाची आणि कार्यपद्धतीची ओळख करून दिली. गो. मा. पवार हे मराठी भाषेचे एक स्कूल होते. या स्कूलमुळे अनेक विद्यार्थ्यांना साहित्याकडे बघण्याची नवी दृष्टी मिळाली, असे मत प्राचार्य अशोक बाबर यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, गो. मा. पवार यांनी मराठी विभागाला कामाची आणि विचारांची एक शिस्त लावून दिली आहे. पुढील वाटचालीसाठी एक वस्तुपाठ घालून दिला आहे. त्यानुसार हा विभाग वाटचाल करतो आहे, याचा मला आनंद वाटतो. प्रास्ताविक मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. राजेश पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. संगीता मोहिते यांनी आभार मानले. यावेळी गो. मा. पवार यांचे चिरंजीव राहुल पवार, विद्यार्थी उपस्थित होते.

# व्यवसायासाठी नाविन्यपूर्ण कौशल्याची गरज

## कृष्णा गावडे यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात कौशल्य विकास अंतर्गत कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

नोकरी आणि व्यवसाय करण्यासाठी नाविण्यपूर्ण कौशल्य आवश्यक आहे. त्याचबरोबर गायन, वादन, लेखन, नृत्य, वक्तृत्व, चित्रकला, छायाचित्रण यांसारख्या कौशल्यामुळे ताण–तणाव कमी होतो, असे प्रतिपादन किर्लोस्कर कंपनीचे माजी सह उपाध्यक्ष कृष्णा गावडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फौंडेशन यांचे संयुक्त विद्यमाने 'आझादी का अमृत महोत्सव" अंतर्गत विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये आयोजित 'कौशल्य व उद्योजकता विकास कार्यशाळेचे" आयोजन केले होते. याप्रसंगी ते बोलत होते. प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी होते.

कृष्णा गावडे म्हणाले, जगामध्ये खुप वेगाने तांत्रिक बदल होत आहेत. बदलते तंत्रज्ञान आत्मसात करणे हे विद्यार्थी आणि उद्योजगाकांसाठी गरजेचे आहे. तांत्रिकदृष्या झपाट्याने बदलत चाललेल्या जगामध्ये टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वत:मध्ये सातत्यपूर्ण बदल घडवत राहणे काळाची गरज आहे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, बदलत्या जागाप्रमाणे तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे. स्पर्धेच्या जगामध्ये टिकण्यासाठी शिक्षण आणि अध्यापन पध्दतीमध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांनी नाविण्यपूर्ण बदल करावे. सर्जनशीलता, संवाद कौशल्ये वाढण्यासाठी योग्य ते प्रयत्न केले पाहिजेत. विद्यापीठाकडून विविध प्रकारचे १३४ कौशल्य देण्याचे प्रयत्न केले जात आहेत त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये कौशल्यांचा आंतरभाव केलेला आहे. कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महेश चव्हाण यांनी सूत्रसंचालन व आभारमानले. यावेळी डॉ. पी. डी. राऊत, डॉ. व्ही. एस. खंडागळे, डॉ. के. बी. पाटील, संलग्नित महाविद्यालयातील कौशल्य प्रशिक्षक, विद्यार्थी, उपस्थित होते.

Times of India

# SUK invites applications for admission to courses

Times News Network

**Kolhapur:** The Shivaji University Kolhapur (SUK) has invited applications for the admission to regular and distance mode degrees, postgraduate degrees and diploma courses like M.Sc, MA, MTech, MBA, MSW, B.Sc etc. offered on campus and at its affiliated colleges

The registration will be conducted online for the admission process. The entrance exams will likely be conducted between May 25 and 29. The last date to fill the online application is May 10 with an entrance examination fee of Rs 500 per course" said SUK Ag registrar Dr V N Shinde

Applications are invited for admission to the regular and distance mode courses (MBA distance mode) — subject to the approval of the UGC and the AICTE, he said.

For details about the entrance examinations, application rules, online enrollment and information regarding admission rounds, candidates may refer to the course directory or visit the university website *www.unishivaji.ac.in* under 'Admission 2022-2023' link.

A candidate is allowed to apply for more than one course. However, he or she will have to apply separately for each subject for entrance/non entrance courses along with the required fees.